International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# ग्रामीण कष्टकरी चळवळीत नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी महिलांचा सहभाग : एक अभ्यास

**निलेश सखाराम गावित[1], डॉ. श्रीनिवास अशोक भोंग[2]**

*राज्यशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र,*

*संगमनेर नगरपालिका कला, डी. जे. मालपाणी वाणिज्य आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त),*

*संगमनेर, अहिल्यानगर.*

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (महाराष्ट्र)*

*Corresponding Author – निलेश सखाराम गावित*

**DOI - 10.5281/zenodo.20580101**

**सारांश (Abstract):**

*महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आदिवासी समाजाचे वास्तव्य आढळते. मानवी जीवनासाठी आवश्यक असलेली जंगल, जमीन आणि जलसंपत्ती या आदिवासी बहुल भागात उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार,अहिल्यानगर, पालघर, रायगड, ठाणे, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये विविध आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत.*

*स्वातंत्र्यानंतरच्या विकास प्रक्रियेत रस्ते, महामार्ग, औद्योगिक प्रकल्प आणि वाढते नागरीकरण यामुळे आदिवासी भागात अनेक सामाजिक-आर्थिक बदल झाले. या प्रक्रियेमध्ये आदिवासी समाजाचे पुनर्वसन, तसेच त्यांचे जंगल, जमीन आणि पाण्यावरील हक्क यांसाठी विविध चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींमध्ये आदिवासी महिलांचा सहभाग लक्षणीय असून त्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.*

*ग्रामीण कष्टकरी चळवळींमध्ये आदिवासी महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. सामाजिक न्याय, आर्थिक हक्क, जंगल-जमीन-पाणी यांसाठी झालेल्या संघर्षात महिलांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. या सहभागाचा अभ्यास केल्यास ग्रामीण समाजरचना, सामाजिक परिवर्तन आणि आदिवासी समाजातील स्त्रियांची भूमिका समजण्यास मदत होते.*

***मुख्य शब्द : ग्रामीण चळवळ , नंदुरबार जिल्हा, सामाजिक परिवर्तन, आदिवासी महिला***.

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्योत्तर काळात सर्वसामान्य जनतेत आपल्या हक्क व अधिकारांविषयी जागृती निर्माण झाली. भारतीय समाजाच्या वंचित घटकांमध्ये देखील आपल्या स्थानिक समस्यांवर मात करण्यासाठी आणि आपल्या हक्क व अधिकारांसाठी संघर्ष करण्याची प्रवृत्ती दिसून येते. देशातील ग्रामीण, कष्टकरी जनतेने आपल्या मूलभूत हक्कांसाठी शासन, प्रशासन आणि समाज यांच्याकडून न्याय मिळावा यासाठी विविध चळवळी उभारल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागातील कष्टकरी जनतेच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी विविध शासकीय योजना राबविल्या जातात. तथापि ग्रामीण कष्टकरी जनतेच्या जीवनात अनेक अडचणी आणि प्रश्न कायम

आहेत. त्यामुळे आपल्या हक्कांसाठी संघटित होऊन संघर्ष करण्याची प्रवृत्ती ग्रामीण समाजात वाढताना दिसून येते.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये नंदुरबार जिल्ह्याचा विशेष उल्लेख करता येतो. मानवी जीवनासाठी उपयुक्त असलेले जल, जंगल आणि जमीन या संसाधनांवर आदिवासी समाजाचे जीवन मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. महाराष्ट्रात नाशिक, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, पालघर, रायगड, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया इत्यादी जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आढळतो. स्वातंत्र्यानंतर विकासाच्या प्रक्रियेत अनेक प्रकल्प, धरणे, रस्ते, महामार्ग आणि विविध योजनांमुळे स्थानिक आदिवासी जनतेचे विस्थापन झाले आहे. या प्रक्रियेमुळे आदिवासी भागातील लोकांना त्यांच्या जल, जंगल आणि जमीन या नैसर्गिक साधनसंपत्तीपासून वंचित राहावे लागले आहे.

या परिस्थितीमुळे आदिवासी समाजात असंतोष निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी संघर्ष सुरू केला. महाराष्ट्र राज्याच्या उत्तरेस गुजरात व मध्यप्रदेश या दोन राज्यांच्या सीमेवर नंदुरबार जिल्हा वसलेला आहे. या जिल्ह्यात भिल्ल,पावरा,कोकणा, मावची, इत्यादी आदिवासी जमातींचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. आदिवासी समाजातील लोक प्रामुख्याने शेती, शेतमजुरी, जंगलावर आधारित व्यवसाय आणि इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून असतात.

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकासाच्या बाबतीत अनेक समस्या भेडसावत आहेत. तसेच महिलांच्या बाबतीत शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, रोजगाराच्या मर्यादित संधी, तसेच सामाजिक व आर्थिक विषमता यांसारख्या समस्या प्रकर्षाने दिसून येतात.

देशातील नंदुरबार जिल्ह्यातील महिलांनी विविध सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. संत सम्राट महाराज, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या माध्यमातून आदिवासी महिलांना संघटित करण्याचा आदिवासी महिलांचा सहभाग वाढताना दिसून येतो.

ग्रामीण कष्टकरी चळवळींमध्ये नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सहभागाचा अभ्यास प्रस्तुत लेखात करण्यात येत आहे.

**सैद्धांतिक चौकट व साहित्याचा आढावा :**

या लेखात ग्रामीण, कष्टकरी (movement), जमात(tribe), लिंग (gender), आदिवासी क्षेत्र (tribal area) या परस्परसंबंधित चौकटींचा वापर करून विश्लेषण केले आहे. आंतरविभागीयत या दृष्टिकोनातून आदिवासी महिलांचा दुर्गम भागात राहून चळवळीतील सहभागाचा अभ्यास केला असून त्यांचा सहभाग केवळ लिंग आधारित नसून मानवी मूलभूत हक्क, आर्थिक ,सामाजिक न्याय मिळवण्यासाठी सक्रिय सहभागाशी संबंधित आहे.

या लेखासाठी वृत्तपत्रातील लेख, समाजसुधारक व इतिहासकरांचे लेखन, संशोधक लेखन, आदिवासी चळवळीतील अभ्यासकांचे संशोधनपर लेख,निवडक ग्रंथ यांचा आधार घेतला आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील कायदे, योजना व धोरणे आणि आदिवासी समाजावरील परिणाम:**

स्वातंत्र्यानंतर भारताने लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचा स्वीकार केला. त्यामुळे समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध कायदे, योजना आणि धोरणे राबविण्यात आली. विशेषतः सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या

उन्नतीसाठी शासनाने विविध विकासात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी केली. या प्रक्रियेत आदिवासी समाजाच्या विकासालाही प्राधान्य देण्यात आले.

आदिवासी समाज परंपरेने डोंगर, दऱ्या, जंगल आणि दुर्गम पर्वतरांगांमध्ये वास्तव्यास असल्यामुळे ते दीर्घकाळ मुख्य प्रवाहापासून दूर राहिले. परिणामी शिक्षण, आरोग्य, वाहतूक, संचार आणि इतर मूलभूत सुविधांपासून हा समाज वंचित राहिला. स्वातंत्र्यानंतर शासनाने आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आदिवासी भागातील आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेत आदिवासी समाजाच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या जतनासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. जमीन, जंगल आणि पाण्यावरील पारंपरिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध कायदे व धोरणे तयार करण्यात आली. यासाठी वनविभाग, महसूल विभाग, पंचायत राज व्यवस्था, पाणीपुरवठा व आरोग्य सेवा विभाग यांसारख्या विविध प्रशासकीय यंत्रणांची स्थापना करण्यात आली.

तथापि विकासाच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर धरणे, सिंचन प्रकल्प, महामार्ग, औद्योगिक प्रकल्प आणि इतर पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या. या प्रकल्पांमुळे अनेक आदिवासी कुटुंबांचे विस्थापन झाले आणि त्यांच्या पारंपरिक उपजीविकेवर परिणाम झाला. जल, जंगल आणि जमीन यांवर आधारित असलेली त्यांची जीवनपद्धती बदलू लागली. परिणामी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरावर विविध समस्या निर्माण झाल्या.

या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाने आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अन्यायाविरुद्ध विविध सामाजिक व राजकीय चळवळी उभारल्या. विशेषतः नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजाने शासनाच्या काही धोरणांविरुद्ध आणि विकास प्रकल्पांमुळे निर्माण झालेल्या समस्यांविरुद्ध संघटित पद्धतीने संघर्ष केला. त्यामुळे या भागात आदिवासी हक्कांशी संबंधित विविध चळवळींचा उदय झाल्याचे दिसून येते.

**नंदुरबार जिल्ह्यातील प्रमुख ग्रामीण कष्टकरी चळवळी:**

महाराष्ट्रातील ग्रामीण आदिवासी भागातील कष्टकरी जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते ग्रामीण आदिवासी कष्टकरी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतमजूर अल्पभूधारक शेतकरी कामगार कोरडवाहू शेती करणारी शेतकरी वन जमिनीवर अवलंबून असणार शेतकरी यांचा समावेश होतो महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आदिवासी कष्टकरी लोकांना भेडसावणाऱ्या अनेक प्रश्न होते दारिद्र्य उपोषण बेरोजगारी व्यसनाधीतपणा अंधश्रद्धेचा पगडा स्त्रियांवर चर्चा याबरोबरच जमिनीच्या ताब्याचा प्रश्न होता देशभरातील आदिवासी समाजांनी चळवळींनी एकजुटीने जुलूम आणि अन्याय अत्याचाराच्या विरोधात प्रखर लढा दिलेला आहे महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ पहिल्यापासून प्रभावी होती स्वातंत्र्यपूर्व काळापासून आदिवासी चळवळीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सहभाग घेतला होता नंदुरबार जिल्ह्यातील आंबा पाणी येथील इंग्रजांशी दिलेल्या सशस्त्र लढ्यात 75 आदिवासी स्त्री-पुरुषांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्रातील ग्रामीण कष्टकरी आदिवासी महिलांचा देखील चळवळीमध्ये सतत सहभाग राहिला असून ,नंदुरबार जिल्ह्यातील प्रमुख ग्रामीण कष्टकरी चळवळी पुढील प्रमाणे आहेत :

**१. श्रमिक सेवा संघ चळवळ :**

श्रमिक सेवा संघ चळवळ सुमारे 1956–57 च्या सुमारास सुरू झाली. या चळवळीचे प्रमुख कार्य म्हणजे

आदिवासी व श्रमिक समाजामध्ये शिक्षण, सामाजिक जागृती आणि संघटन निर्माण करणे होय. या संघटनेच्या माध्यमातून आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, सामाजिक अन्याय व शोषणाविरुद्ध आवाज उठवणे तसेच समाजामध्ये एकोपा निर्माण करणे यासाठी प्रयत्न करण्यात आले.

या संघटनेने आदिवासी व श्रमिक समाजामध्ये सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी विविध कार्यक्रम राबवले. आदिवासी समाजातील लोकांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्यासाठी सभा, बैठका आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

श्रमिक सेवा संघाच्या माध्यमातून आदिवासी भागातील लोकांना संघटित करून त्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी या संघटनेने महत्त्वपूर्ण कार्य केले.

या चळवळीमुळे आदिवासी समाजामध्ये जागृती निर्माण झाली आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळाली. पुढे या चळवळीमुळे आदिवासी समाजामध्ये संघटनात्मक शक्ती निर्माण होऊन विविध सामाजिक चळवळींना प्रेरणा मिळाली.

**२. नर्मदा बचाव आंदोलन :**

नर्मदा बचाव आंदोलन हे, मध्यप्रदेश,महाराष्ट्रआणि गुजरात राज्यातून वाहणाऱ्या नर्मदा नदीवर गुजरात राज्यात बांधण्यात येत असलेल्या सरदार सरोवर धरणाविरुद्ध, गुजरात व महाराष्ट्राच्या स्थानिक आदिवासीच्या विस्थापन व पुनर्वसनाच्या प्रश्नांतून या आंदोलनाची सन 1985 मध्ये मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली. नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या हजारो कुटुंबांना त्यांचे मूळ गाव सोडून स्थलांतरित व्हावे लागले नदी जंगल आणि नदीलगतची जमीन यावर आधारित त्यांचे स्थानिक,सामाजिक, सांस्कृतिक जीवन विस्कळीत झाले. नंदुरबार जिल्ह्यात शहादा, अक्कलकुवा,धडगाव,तळोदा या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सरदार सोऱ्ओवर प्रकल्पग्रस्त आणि विस्थापित लोक असल्याने प्रामुख्याने या भागात नर्मदा बचाव आंदोलन सक्रिय होते.सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी स्थानिक महिला, सामाजिक कार्यकर्ते,सामान्य लोकांना नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून एकत्र आणले आणि सरकार, प्रशासन व शासकीय यंत्रणा यांच्या विरोधात शांततेच्या मार्गाने प्रकल्पग्रस्त ,स्थानिक आदिवासी व पर्यावरणासाठी जन आंदोलन सलग तीसवर्षेहूंन अधिक काळ सुरू ठेवले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक आणि प्रत्यक्ष नर्मदा नदीपात्रात विस्थापितांच्या आणि प्रकल्पग्रस्तांच्या हक्क, न्यायासाठी वेळोवेळी मोर्चा, आंदोलने आणि निवेदन या माध्यमातून चळवळ सुरू ठेवून न्याय मिळवण्याच्या सतत प्रयत्न केलेला असून त्याला काही प्रमाणात यश देखील मिळालेले दिसून येते. मेधा पाटकर यांच्या नर्मदा बचाव आंदोलनामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील स्थानिक महिलांनी आपल्या हक्कांची जाणीव जागृती झाल्यामुळे, मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतलेला दिसून येतो.शांततेच्या मार्गाने चाललेल्या आंदोलनाची दखल वेळोवेळी शासन प्रशासनाला घ्यावी लागलेली आहे.

**३. वन जमिनी आणि वन हक्क चळवळ :**

नंदुरबार जिल्ह्यात वन जमिनी आणि वन हक्क चळवळी सक्रियपणे सुरू असल्याचे दिसून येते शासनाने सन 2006 मध्ये वन हक्क कायद्यानुसार वन जमिनी धारक तसेच वनपट्टेधारक आदिवासी लोकांना त्यांच्या नावावर वन जमिनी तसेच वनपट्टे देण्याचे निश्चित केले मात्र प्रत्यक्षात स्थानिक आदिवासी भूमिहीन शेतमजूर शेतकरी

अल्पभूधारक कष्टकरी लोकांना वनपट्टे व वनजमिनी त्यांच्या नावावर नोंद होण्यासाठी दीर्घकाळ जिल्ह्यात सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा च्या माध्यमातून सभेच्या माध्यमातून वेळोवेळी चळवळ सुरू ठेवण्यात आले आणि दीर्घकाळ चाललेल्या या चळवळीमुळे शासनाने टप्प्याटप्प्याने वन जमिनी स्थानिक शेतकरी कष्टकरी लोकांच्या नावावर करण्यास काहीशी सुरुवात केलेली दिसून येते सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या माध्यमातून वनपट्टेधारक शेतकरी शेतमजूर यांनी वेळोवेळी आंदोलन मोर्चे यांच्या माध्यमातून अनेक प्रकारचे संघर्ष जिल्हाधिकारी नंदुरबार मंत्रालय मुंबई नाशिक विभागीय कार्यालय नाशिक असे विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लढा दिलेला दिसून येतो. वनपट्टे तथा वनजमिनी यांचे विषयीची चळवळ मोठ्या प्रमाणावर नंदुरबार जिल्ह्यात नवापूर तालुका नंदुरबार तालुका आणि शहादा तालुक्यात सुरू असल्याचे दिसून येते. सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या माध्यमातून स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सदस्य सत्यशोधक ग्रामीण सभेचे कार्यकर्ते तसेच स्थानिक महिला यामध्ये नजूबाई गावित जिजाबाई वसावे जिजाबाई वसावे यांनी महिलांमधून नेतृत्व केल्याचे दिसून येते. वन जमीन विषयीच्या या चळवळीमध्ये या महिला पुरुषांच्या बरोबरीने चळवळीत सहभागी झाल्याचे दिसून येते.

**४. आदिवासी एकता परिषद :**

आदिवासी एकता परिषद ही संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आदिवासी हक्क घोषणा पत्रानुसार स्थापन झालेली आदिवासी अधिकारांविषयी जनजागृती करणारी संघटना आहे आदिवासी एकता परिषदेही संघटना महाराष्ट्र गुजरात मध्य प्रदेश राजस्थान या आदिवासी जिल्हे मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या राज्यातील काही जागरूक सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली सामाजिक संघटना आहे आदिवासी एकता परिषदेमध्ये आदिवासी समाजात विविध विषयांवर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सांस्कृतिक चळवळी यामध्ये काम करणारे समाजसेवक या सर्वांना एकत्र आणून आदिवासी समाजाबद्दल एक मानव मुक्ती प्रकृती म्हणजेच निसर्ग हे जीवन आहे आणि निसर्गाशी अनुकूल जीवन ठेवून संविधानिक मार्गाने वाटचाल करणारे संघटन आहे आदिवासी एकता परिषदेची खऱ्या अर्थाने सुरुवात ही भेदभाव मूलक वागणूक विरुद्ध संघर्ष करण्याचे हेतूने झालेली दिसून येते. हळूहळू आदिवासी एकता संघटनेच्या माध्यमातून आदिवासी समाजातील स्त्री पुरुष समानता विषयक दृष्टिकोन, आदिवासी समाजामध्ये शिक्षण विषयीची जनजागृती, आदिवासींमध्ये असलेल्या चांगल्या चालीरीती, रूढी, परंपरा यांच्या विषयीची जाणीव जागृती आदिवासींमध्ये असलेल्या, काही वाईट प्रथांचे उच्चाटन आणि आदिवासींचे होणारे शोषण रोखण्याच्या दृष्टीने जनजागृती पर कार्य या हेतूने आदिवासी एकता परिषदेचे कामकाज सुरू झालेले दिसून येते. डॉ. कनू वसावा यांच्या मते आदिवासी एकता परिषदेची स्थापना 1992 मध्ये महाराष्ट्र राज्यातील काही कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन नंदुरबार जिल्ह्यात स्थापना केली. त्याचा विस्तार आज आदिवासीबहुल असलेल्या देशभरातील राज्यांमध्ये झालेला दिसून येतो. आदिवासी एकता परिषदेचे पहिले अधिवेशन 1 जानेवारी 1993 रोजी गुजरात मध्ये झाले त्यावेळेस मध्य प्रदेश व राजस्थान मधील वेगवेगळ्या संघटनांनी या अधिवेशनात सहभाग घेतला होता, सर्व संघटनांच्या वैचारिक देवाणघेवाणीतून पुढे दुसरे अधिवेशन 14 व 15 जानेवारी 1994 रोजी नंदुरबार जिल्ह्यातील अंकुशविहीर तालुका अक्कलकुवा जिल्हा नंदुरबार या ठिकाणी पार पडले. दुसऱ्या परिषदेमध्ये गुजरात महाराष्ट्र मध्य प्रदेश व राजस्थान या राज्यांमधील अनेक आदिवासी सामाजिक सांस्कृतिक कार्यकर्ते एकत्र आले आणि त्यानंतर

दरवर्षी जानेवारी महिन्यात 14 व 15 तारखेच्या दरम्यान आदिवासी एकता परिषदेचे अधिवेशन देशभरात पार पडत असते. आदिवासी एकता परिषद मानवतेच्या दृष्टिकोनातून आदिवासी आणि निसर्ग यांच्या संवर्धनासाठी कार्य करत आहे.

**कष्टकरी, आदिवासी महिलांच्या सहभागाची वैशिष्ट्ये:**

**१. सामुदायिक व स्थानिक सहभाग:**

नंदुरबार जिल्ह्यातील कष्टकरी आदिवासी महिलांचा चळवळीतील सहभाग हा सामुदायिक व स्थानिक स्वरूपाचा आहे.त्यांनी स्थानिक समस्या श्रमिक शोषण,विस्थापन,पुनर्वसन,जल व जंगळविष्यक हक्क,आदिवासी संस्कृती संवर्धन यांविषयी सक्रिय सहभाग घेतलेला दिसून येतो.

**२. स्वातंत्र्योत्तर काळातही हक्क व न्यायासाठी धडपड:**

कष्टकरी चळवळीच्या माध्यमातून दैनंदिन जीवनाशी संबंधित समाजातील ज्वलंत प्रश्न आणि समस्या यांकडे दुर्लक्ष न करता संविधानिक व शांततेच्या मार्गाने नंदुरबार जिल्ह्यातील महिला आपल्या हक्क व न्याय यासाठी संघर्षरत असल्याचे दिसून येते.

**आदिवासी महिलांच्या चळवळीतील सहभागाचे महत्व:**

आदिवासी महिलांच्या नंदुरबार जिल्ह्यातील चळवळीतील सहभागामुळे :

1. शासन व प्रशासनास लोकाभिमुख सामाजिक न्याय व आदिवासी हककविष्यक भूमिका घ्यावी लागली.
2. कष्टकरी आदिवासी महिलांचा सामूहिक हितासाठी ,पर्यावरण संरक्षण,संवर्धनासाठी सहभाग घडून आला.
3. शांततापूर्ण व संविधनिक मार्गाने केलेल्या जन आंदोलनात कष्टकरी महिलांचा निश्चय व निर्धार अहिंसक मार्गावरचा विश्वास दिसून येतो.
4. समकालीन काळात समाज आणि पर्यावरण विषयक संघर्षासाठी वैचारिक व संघटनात्मक प्रेरणा तयार झाली.

**निष्कर्ष :**

कष्टकरी ग्रामीण चळवळीत आदिवासी महिलांच्या सहभाग हा केवळ प्रशासन आणि व्यवस्थे विरुद्धचा लढा नसून,जल,जमीन आणि जंगले या नैसर्गिक संसाधने ,अस्मिता,संस्कृती यांचे संरक्षण व संवर्धन यासाठी जाणीवपूर्वक केलेली वाटचाल आहे. आदिवासी महिलांच्या चळवळीतील सक्रिय सहभागामुळे समाजाचे हित,निसर्ग व पर्यावरणाचे महत्व, हक्क व न्याय या विषयी शासन व व्यवस्थेला दखल घेणे क्रमप्राप्त ठरल्याचे दिसून येते. चळवळीत संदेशवहन,संघटन आणि प्रत्यक्ष संघर्षातील सहभाग यामुळे समाजातील वंचित गटाला त्यांचे हक्क व अधिकार प्राप्त करण्यात मोलाचे योगदान दिल्याने ते कष्टकरी ,ग्रामीण चळवळीतील त्यांचा सहभाग महत्वाचा ठरतो.

**संदर्भग्रंथ :**

1. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल : ऐतिहासिक सामाजिक मागोवा ,कांटीनेन्टल प्रकाशन पुणे,२००२
2. पावरा के. ए.,आदिवासी संस्थानिकांचा इतिहास, अथर्व पब्लिकेशन्स जळगाव, २०२४
3. लता बापट, महाराष्ट्रातील आदिवासी स्रिय,त्यांचे स्थान आणि समस्या,परामर्श खंड ११ अंक १ मे १९८९, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ १९८९

4. सेनगुप्त वृंदा,स्वतंत्रता उपरांत आंदोलनमे जनजातीय भूमिका,international journal review and reserch in social science April- june 2014
5. टाटिया कांतीलाल, रावलापाणी - गाथा संघर्षाची,मासिक लोकराज्य माहे ऑगस्ट २०१६ पुष्ट क्र.३२
6. वसावा कनू ,आदिवासी एकता परिषद संघटनो का संघटन,गुजराती द्विमासिक आदिलोक,जानेवारी फेब्रुवारी २०२२, पृष्ठ ४
7. कुलकर्णी अंजली, आदिवासी चळवळ आणि स्त्रिया,दैनिक लोकसत्ता दिनांक २१/०१/२०१६
8. गावीत माहेश्वरी,नाजूबाई गावीत -एक लढवय्यी कार्यकर्ती लेखिका,दैनिक महाराष्ट्र टाईम्स,दिनांक २९/०९/२०१८